# पोलीस आयुक्तालय, अमरावती शहर

## दिनांक २७/१०/२०२२ - दैनिक गुन्हे

### भाग १ ते ५

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | चोरीस गेला माल | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | बडनेरा | अप.क्र. ८०९/२२ कलम ३७६(२)(n), ३१६, ४१७, ५०६ भा. दं. वि. | महीलेस लग्नाचे आमिष दाखवुन इच्छेविरूध्द जबरदस्तीने वारंवार शारिरिक संबंध ठेऊन गर्भपात | ----- | ग्राम माहुली, शतायु ओयो हॉटेल, पो.स्टे. माहुली, अमरावती ग्रामिण. | दि.१५.०२.२०२२ चे १४.०० वा ते दि. २७.०८.२२ चे १५.३० वा. दरम्यान. . | दि.२६.१०.२०२२ चे ००.०६ वा. | एक महीला | अरसलाम काझी वल्द आमीर काझी रा अमरावती. | व.पो.नि. बाबाराव अवचार, ASI अहेमद अली ब.नं.७८४ पोस्टे बडनेरा अमरावती शहर भेट देणाची वेळ २०.०० ते २०/४५ वा. | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी हि हॉस्पीटल मध्ये नर्स ची नोकरी करीत होती. त्याच हॉस्पीटलच्या समोरील हॉस्पीटल मध्ये आरोपी काम करतो. आरोपीने फिर्यादीसोबत ओळख वाढवुन मी तुझ्याशी प्रेम करतो, तुझ्यासोबत लग्न करायचे आहे, असे आमिष देऊन नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादीसोबत तिच्या इच्छेविरूध्द ६ ते ७ वेळा शारिरिक संबंध प्रस्थापित केले. त्यानंतर फिर्यादीने आरोपीस लग्नाबाबत म्हटले असता आरोपीने त्याच्या आईचे हुंड्यात काय देणार, असे म्हणणे असल्याचे कळविले. ५ महीन्यापुर्वी फिर्यादीने तिच्या प्रेग्नेन्सीबाबत माहीती आरोपीस दिली असता आरोपीने तिला गर्भपात करण्यास सांगितले. फिर्यादीने नकार दिला असता आरोपीने तिला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली होती. त्यानंतर आरोपीने मेडीकल मधुन औषधे आणुन फियीदीस पाजली ज्यामुळे तिचा गर्भपात झाला. आरोपीने लग्नाचे खोटे आमिष दाखवुन फिर्यादीसोबत वारंवार तिचे इच्छेविरूध्द शारिरिक संबंध प्रस्थापित केले. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्टवरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| २ | बडनेरा | ८१०/२०२२ कलम ३७९ भा. दं.वि. | चोरी | सुझुकी ऑरेंज कंपनीची मो. सा. क्र. MH२७AY-२७३७, कि. अं. १०,०००/- रू. | बडनेरा रेल्वे स्टेशन, पार्कीग जवळ, नवी वस्ती, बडनेरा. | दि. २५.१०.२०२२ चे ०६.१५ वा. | दि. २६.१०.२२ चे ११.४१ वा. | एक महीला | अज्ञात. | पो.नि. बाबाराव अवचार, ASI इकबाल खान, ब.न. १७६०, पो.स्टे. बडनेरा, अम. शहर वेळ - ११.०० वा. ते ११.३० वा. | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील फिर्यादीने तिची नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी सुझुकी ऑरेंज कंपनीची मो. सा. क्र. MH२७AY- २७३७ ही बडनेरा रेल्वेस्टेशन येथील पार्कीग जवळ लॉक करून उभी केली व तिकीट काढण्याकरिता गेली असता कोणीतरी अज्ञात चोराने तिची मोटरसायकल चोरून नेली. अशा जबानी रिपोर्टवरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| ३ | फ्रेजरपुरा | अप क्र.६८१/२२ | मारहान | निरंक | महादेवखोरी | दि.२५.१०.२०२२ | दि.२६.१०.२०२२ | अनिल भिमराव | गौरव वानखडे रा | भेट देनारे ,दाखल व | हकिकत अशा प्रकारे आहे की, फिर्यादी यांना मुलगा आहे |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अमरावी शहर | कलम ३२४,५०४ भादवी | | | अमरावती | चे २२.३० वा | चे ०१.३८ वा | क-हाडकर वय ५५ वर्ष धंदा -भाजीपाला विक्री रा महादेवखोरी अमराती | महादेवखोरी अमरावती . | तपास अधिकारी स पो उप नि विनोद चिखलकर ब.नं.754 पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर.दि.25.10.2022 चे 23.00 वा | परंतु तो डोक्याने मंद आहे त्यामुळे मोहल्यात लोक त्याची गंमत घेतात.नमुद घ ता वेळी व ठिकाणी फिर्यादी व त्यांचा मुलगा हे घराजवळ उभे असतांना फिर्यादी यांचे घरामागे राहनारा आरोपी नामे गौरव वानखडे हा आला व तो फिर्यादी यांचे मुलासोबत गंमत करीत होता म्हणुन फिर्यादी यांनी आरोपीस म्हटले की, तु मुलाला कोणालाही काहीही म्हणायला लावतो, यापुढे माझ्या मुलाची गंमत करायची नाही .यावर आरोपी याने फिर्यादीसोबत वाद करुन शिवीगाळ केली व त्याचे हातातील बाशाने फिर्यादिचे डोक्यावर मारले त्यामुळे फिर्यादीचे उजवे कानाचे वर डोके फुटुन रक्त निघाले तसेच त्याचा मार हुकवितांना बाशाने फि.चे उजव्या तळहाताला सुध्दा मार लागला व रक्त निघाले .अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट व मेडिकल सर्टिफिकेट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| ४ | फ्रेजरपुरा | ६८३/२२ कलम ३०७,३२३, ५०४,३४ भा.द.वी. | लाथाबुक्याने मारहाण करुन जिवानिशी ठार मारण्याच्या उद्देशाने धारदार शस्त्राने वार करुन जख्मी करणे. | निरंक | लायब्ररी चौक अमरावती | २६.१०.२२चे १७.३० वा | २६.१०.२२चे २२.२३ वा | देवा रामधार जयस्वाल वय२६रा. शिव एकता चौक फ्रेजरपुरा अमरावती | 1)निखील उर्फ बाबु राजेश तिरथकर वय२७वर्ष २)निहाल उर्फ ज्ञान मुकेश तिरथकर वय२४ वर्ष ३)मोहीत उर्फ भय्यु सुभाष सुर्यवंशी वय २१ वर्ष तीन्ही रा.लायब्ररी चौक अमरावती | भेट देणारे व दाखल अधि. पोउपनि दत्ताबबन नरवाडे पोस्टेफ्रेजरपुरा अमरावती<br><br>भेट 18.00 वा ते 19.00 वा दरम्यान.<br><br>प्राथमीक तपास अधि. पोउपनि दत्ता बबन नरवाडे पोस्टे फ्रेजरपुरा | हकीकत अशा प्रकारे आहे की,यातील फिर्यादी हे दुपारी १४.०० वा दरम्यान कामावरुन घरी आले असता फिर्यादी चा भाऊ सुरज जयस्वाल व आरोपीक्र.१निखील तिरथकर यांचे मध्ये भांडण सुरु होते.फिर्यादी यांनी दोघांचेही भांडण सोडवुन भाऊ सुरज जयस्वाल यास घरी घेवुन गेले.फिर्यादी हे जेवन झाल्यानंतर कामानिमीत्त बाहेर गेल व परत आल्यानंतर फिर्यादीचा भाऊ सुरज जयस्वाल हा जख्मी अवस्थेत घरी धावत आला तेव्हा त्याचे पोटातुन रक्त वाहत होते फिर्यादीने त्यास मित्राचे दुचाकीवर बसवुन इर्वीन दवाखाना येथे भरती केले, रस्त्यामध्ये फिर्यादीचा भाऊ याने सांगीतले की दुपारी झालेल्या भांडणावरुन निखील तिरथकर यास म्हटले की तु माझे सोबत राहु नको तेव्हा निखील बोलला की तु इतना बडा भाई हो गया क्या, असे बोलुन त्याने शिवीगाळ केली व चाकुने पोटावर मारुन जख्मी केले व आरोपी क्र.२निहाल तिरथकर याने सुध्दा चाकुने मारुन जख्मी केले तसेच आरोपी क्र.३ भय्यु सुर्यवंशी याने लाथाबुक्यांने मारुन जिवानिशी ठार मारण्याच्या उद्देशाने धारदार शस्त्राने वार करुन जख्मी केले.फिर्यादीच्या अशा जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | दाखल करुन तपासात घेतला. |
| ५ | गाडगे नगर अमरावती शहर | अप क्र १२७२/२०२२ कलम ४९८अ,३०६ भादवि | पती कडुन शारिरिक व मानसिक छळव आत्महत्तेस प्रवृत्त करणे | ----- | संमती शिक्षक कॉलनी टॉवर लाईन अमरावती | दि २५.१०.२०२२ चे २०.०० वा पुर्वी | दि २६.१०.२०२२ चे ०२.१५ वा | विजय अन्नाजी आखरे वय ६५ वर्ष व्यवसाय डॉक्टर रा पटेल नगर साई नगर परीसर अमरावती | प्रदीप रंगराव वानखडे वय५५वर्ष रा संमती शिक्षक कॉलनी टॉवर लाईन अमरावती | पोउपनि बापुराव खंडारे सोबत पोस्टॉफ पोस्टे गाडगे नगर अमरावतीशहर दि २६.१०.२०२२ चे ०२.१५ वा ते ०२.४५ वा | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांनी दिलेल्या जबानी रिपोर्ट नुसार फीर्यादीची लहाण बहीण ही तिचे नातेवाईका सोबत नमुद घटनास्थळी राहते. मागील दोन ते तीन वर्षापासून फीर्यादीचे बहीण फीर्यादीला नेहमी फोन करुन सांगायची, नातेवाईक मला नेहमी टार्चर व घरी येत नाही. नेहमी छळ करुन म्हणायचे तु व तुझी मुलगी मला आवडत नाही म्हणून छळ करायचे व सांगायचे मी दोघांनाही सुखाने जगु देणार नाही. व तुम्हाला जिवानिशी मारीन. अशी धमकी दयायचे अशी फीर्यादीची बहीणी फीर्यादीला सांगायचे. दि. २४.१०.२०२२ रोजी सकाळी १०.४५ वा फीर्यादीला त्यांची बहीणीचा फोन आला व त्यांनी फीर्यादीला दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या व आम्हाला टार्चर करीत आहे. असे सांगितले नंतर फोन बंद झला. तसेच दि. २५.१०.२०२२ रोजी रात्री ०८/४५ वा चे सुमारास फीर्यादीला गाडगे नगर पोलीस चा फोन आला की इंद्रप्रस्थ कॉलनी अमरावती येथे तुमच्या घरचे नातेवाईकाचे सोन्या चांदीचे दागिणे व नगदी पैसे सापडले आहे . तुमचा नातेवाईकाचा फोन लागत नाही व तुमच्या बहीणीचा पण फोन लागत नाही. तुम्ही पो स्टे ला या असे सांगितल्याने फीर्यादी हे पो स्टे ला आले व पोलीसांसह व नातेवाईकांसह बहीणीच्या घरी नमुद घटनास्थळी गेले. फीर्यादीचे बहीणीचे घर आतुन बंद दिसले घराचे दार तोडून पाहीले असता हॉलमध्ये पंख्याला ओढणीने फीर्यादीची बहीण व भाची हे ओढणीच्या साहाय्याने पंख्याला गळफास घेवून आत्महत्या केलेल्या स्थितीत दिसले. माझी बहीण व भाची यांच्या मृत्यूस माझ नातेवाईक हा जबाबदार आहे. त्याच्या छळामुळे फीर्यादीच्या बहीण व भाचीने आत्महत्या केली आहे. अशा फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरून व मेडिकल सर्टी वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला |
| ६ | गाडगे नगर अमरावती | अप क्र १२७३/२०२२ कलम १४३ | गैरकायदयाची मंडळी जमवने | ----- | पंचवटी उडडाण पुलावर | दि २५.१०.२०२२ चे २३.५९वा चे सुमारास | दि २६.१०.२०२२ चे ०३.१५ वा | वपोनि श्री आसाराम हीरुभाउ चोरमले वय ५२ | १) एम एच ३२ एई ७०७९ होंडा ॲक्टीवा , | पोउपनि बापुराव खंडारे सोबत पोस्टॉफ पोस्टे गाडगे | हकीकत अशा प्रकारे की, नमुद घतावेळी यातील फीर्यादी हे इंद्रप्रस्थ कॉलनी संमती शिक्षक कॉलनी वरुन घराकडे परत जात असतानां नमुद घटनास्थळावर पाच ते सहा मुले |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | शहर | भादवि सहकलम १३५ मपोका | | | अमरावती | | | वर्ष व्यवसाय नोकरी रा. नेमणुक पो स्टे गाडगे नगर अमरावती | २) एम एच २७ बी एस ४८३३ होंडा अँक्टीवा , ३) विना नंबरची बॅटरी गाडीचे चालक | नगर अमरावतीशहर दि २६.१०.२०२२ चे ०३.१५ वा ते ०३.४५ वा | रोडवर गोंधळ घालत असताना व रोडवर आरडाओरड करीत असता वेळ अंदाजे २४.०० वा चे सुमारास फीर्यादीनी त्यांना आवाज दिला असता ती मुले पळून गेले सदर मुलांनी सार्वजनिक रोडवर कुठलेही कारण नसतांना मोठमोठयाने ओरडून रस्त्यात वाहने उभी करुन वाहतुकीला अडथळा निर्माण केला व गैरकायदयाची मंडळी जमवून रोडवर गोंधळ घातला नमुद आरोपीतांनी घटनास्थळावर वरील नंबरच्या गाडया मिळून आल्या.अशा फीर्यादीच्या लेखी रिपोट्रवरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| ७ | राजापेठ | ९२४/२२ कलम ३२४,३२३, ५०४,३४ भादवी | दुखापत | ----- | फिर्यादीचे राहते घरासमोर राजापेठ टॉपर हॉस्टेल मागे ,अमरावती. | दि.२५/१०/२०२२ चे २२/०० वा दरम्यान | दि.२५/१०/२०२२ चे ००/५३ वा | अजय हेमराज धुर्वे वय २३ वर्षे रा - राजापेठ टॉपर हॉस्टेल मागे अमरावती. | १.ओम भलावी २. संतोष गाते ३. मॉगी नावाचा इसम ४. कार्तीक यादव | पोउपनि गंगाधर जाधव पोस्टे राजापेठ अमरावती.<br><br>दि.२५/१०/२०२२ चे २२/३० ते २३/३० वा. | गुन्ह्याची थोडक्यात हकीकत अशा प्रकारे आहे कि,नमुद घ.ता.वेळी व ठीकाणी यातील नमुद फिर्यादी व आरोपी हे नातेवाईक असुन त्यांच्यात प्रॉपर्टी वरून वाद आहे दि २५/१०/२२ रोजी रात्री १०/०० वा दरम्यान फिर्यादी घरी असतांना आरोपी ओम भलावी यांचा मित्र मागी याने फिर्यादीला घराबाहेर बोलाविले त्यामुळे फि घराबाहेर गेला असता तु ओम ला काय बोलला तर मी त्याला म्हटले कि फीर्यादी काही त्याला बोलला नाही तेव्हा तिथे ओम भलावी त्याच्या सोबत त्यांचे मित्र संतोष गाते व कार्तीक हे धावत आले व सर्व मिळुन फिर्यादीला शिवीगाळ करून थापडांनी मारहान करू लागले तेव्हा मी आरडाओरड केला त्यामुळे फिर्यादीचे घरचे लोक बाहेर आले. तेव्हा मला ओम भलावी यांने त्यांचे जवळ असलेला चाकु माझा उजव्या पायाच्या मांडीवर मारला त्यामुळे मला जखम झाली. माझे वडील मधात आले असता त्यांना सुद्धा हात भुक्क्यांनी मारहान केली . फिर्यादीचे वडील यांना किरकोळ मार असल्याने त्यांचे मेडीकल करू इच्छीत नाही . त्यांच्या वर योग्य कार्यवाही व्हावी करीता रीपोर्ट देत आहे . अशा फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट व मेडी सर्टी वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| ८ | सिटी कोतवाली अमरावती | अप क्र ५२९/२०२२ कलम | चोरी | १६ नग मोबाईल एकुन १,९१०२० रु. चा | मंगल लक्ष्मी मार्केट जयस्तंभ चौक | दि. २४.१०.२२ ते दि. २५.१०.२२ चे २१.३० वा. | दि २६.१०.२२ चे ००.२९ वा | योगेश राजकुमार रत्नानी वय ३६ वर्ष रा. व्यंकटेश | अज्ञात | पोउपनी राजेंद्र उमक पो. स्टे. सिटी कोतवाली अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी हे दि. २४/१०/२२ रोजी रात्री २१.३० वा दरम्यान आपले दुकाण बंद करुन घरी निघुन गेले. दि. २५/१०/२२ रोजी सकाळी |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | श | ४५७,३८० भादवि | | माल व नगदी ३१०० रु असा एकुन १, ९४१२० रु. चा माल | अमरावती | दरम्यान | | कॉलनी शंकर नगर अमरावती | | दि. २६/१०/२२ चे ००.३० वा ते १.०० वा दरम्यान | १०.३० वा दरम्यान मॅनेजर मोहम्मद जफर मोहम्मद हसन हे दुकाण उघडण्यास आले असता त्यांना दुकाणाचे लहाण शटरचे कुलुपा जवळील लोखंडी कळया तुटलेल्या दिसल्या यावरुन त्यांनी फिर्यादीला फोन दवारे माहिती दिली. फिर्यादी यांनी लगेच येवुन पाहिले व पोलीसांना माहिती दिली असता त्यांचे डिआर मोबाईल शॉपी दुकाणाचे लहान शटरचे कुलुपा जवळील लोखंडी कळया तुटलेल्या दिसल्या दुस-या शटरचे लॉक उघडुन पहानी केली असता दुकाणा मधिल रॅकमध्ये ठेवलेले मोबाईल स्टॉक पैकी१६ मोबाईल व नगदी ३१०० रु. चोरी केल्याचे निदर्शनास आले कोणीतरी अज्ञात चोराने दुकाणाचे लहाण शटरचे लॉक जवळील कळया तोडुन आत प्रवेश करुन चोरी केली आहे. दुकाणातील मोबाईल चा स्टॉक चेक करुन IMEI नं. काढण्यास वेळ झाल्याने आता पोस्टे ला येवुन रिपोर्ट देत आहे. अशा फिर्यादीचे जबाणि रीपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दख्खिल करुन तपासात घेतला |
| ९ | पोस्टे सिटी कोतवाली | अप क्र.५३०/ २०२२ कलम ३७९ भादवि | चोरी | हिरो होंन्डा स्प्लेंन्डर पार्क MH-२७ V-६८७९ काळ्या रंगाची पट्टा असलेली चेचीस नं. ०५A१६F१३०८४, इंजिन नं.०५A१५E१३०१३ जुनी वापरती किं.अं.२०,०००/-रु. | ईर्विन दवाखाना,अमरावती | दि.२३/१०/२०२२ चे १० वा ते १०.१० वा दरम्यान | दि.२६/१०/२०२२ चे १७.४० वा | शेख शारुख शेख एजाज, वय २४ वर्ष,रा. गुलीस्ता नगर, धरमकाट्याच्य मागे वलगाव रोड अमरावती | अज्ञात | पोउपनि बालाजी वळसने, रा.पो.स्टा. सिटी कोतवाली अमरावती शहर दि.२६/१०/२०२२ चे १७.५० वा ते १८.०० वा | हकीकत असा प्रकारे आहे की, यातील नमुद घटना,ता., वेळी व ठिकाणी फिर्यादी त्यांच्या मित्रा ला भेटण्याकरिता ईर्विन दवाखा येथे गेले असता त्यांनी त्यांची गाडी हिरो होंन्डा स्प्लेंन्डर पार्क MH-२७ V-६८७९ काळ्या रंगाची पट्टा असलेली चेचीस नं. ०५A१६F१३०८४, इंजिन नं.०५A१५E१३०१३ जुनी वापरती किं.अं.२०,०००/-रु. ची ईर्विन दवाखा येथील झेड्या जवळ उभू केली व थोड्या वेळाने गाडी ठेवलेल्या ठिकाणी परत आले अ्सता त्यांना त्यांची गाडी दिसुन आली नाही. आजु बाजुला शोध घेतला मिळुन आली नाही.ती. कोणीतरि अज्ञात चोराने चोरुन नेली असा फिर्यादीचे जबाणि रिपोर्ट वरुन व डि.ओ.यांच्या आदेशाने सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| १० | खोगेट | २६२/२२ कलम ३८०,४५४, ४५७ भादवि | घरफोडी | सोन्याचे २ ग्राम चे कानातले कि ,१०,००० २) डायमंड | छाया कॉंलनी अमरावती | २४/१०/२०२२ चे १२/३० वा ते २५/१०/२०२२ चे २३/४५ वा | २६/१०/२०२२ चे २१/०० | एक महीला | अज्ञात | भेट देणारे अधिकारी तपासी अधिकारी पोउपनी होळगे सा २६/१०/२०२२ चे | हकीकत अश्या प्रकारे आहे की यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी फिर्यादी हे दिवाळी निमित्त मुलीसह आपले घराला कुलुप लावुन भातकुली येथे गेली असता परत आली तेव्हा तिला घराचे दाराचे कुलुप उघडया |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सोन्याची २.५ ग्रमची अंगठी १२,५०० रुपये ३) नगदी १०,००० रुपये असा एकुण ३२५०० रु चा माल | | दरम्यान | | | | २१/१५ वा ते २१/३० वा लागलीच | स्थीतीत कोंडयाला अटकलेले दिसले आत जावुन पाहले असता कपाटातील ठेवलेले पर्स मधील सोन्याचे २ ग्रमचे कानातले कि.१०,००० रु.डायमंड ची सोन्याची २.५ ग्रॅमची अंगठी कि १२,५०० रुपये नगदी १०,००० रुपये असा ३२५०० रु चा माल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेले फिर्यादी यांनी घराची चाबी घर मालक नामे पंडीत अवधुत जाधव यांचे कडे दिल्याने माझा त्यांचेवर संशय आहे अश्या फिचे जबानी रिपोर्टवरुन सदर चा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |

भाग १ ते ६

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | मिळालेला / जप्त माल | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | बडनेरा | अप.क्र.८१२/ २२ कलम २८३ भादवी | - वाहतुकीस अडथळा व जिवीतास धोका | | जयहिंद चोक नवी वस्ती बडनेरा | दि. २६.१०.२२ चे १८.३० वा. | दि. २६.१०.२२ चे २०.४७ वा. | पोहेका शैलेश मोरे ब.नं.१०२९ पोस्टे बडनेरा अमरावती शहर | सुशिल मुकेश संगते वय-२३ वर्ष रा. तिलक नगर जुनी वस्ती बडनेरा | PSI गजानन बोरवार, ब.न. ९१८ पो.सटे. बडनेरा, अम. शहर. वेळदि. २६.१०.२२ चे १८.३० वा. वा ते १९.०० | हकीकत अशाप्रकारे आहे की, य तील नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी आरोपीने त्याच्या ताब्यातील ऑटो क्र. MH-२७-AF-२६०१ हा सार्वजनिक रस्त्यावर नागरिकांना व वाहतुकीस धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभा करून ठेवलेला मिळुन आला. वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |

प्रोव्हीबीशन

| अ.क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | मिळाला माल | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| १ | बडनेरा | अप.क्र ८११/२२ कलम ६५ (इ.) मदाका. | अवैधरित्या विनापरवाना दारू विक्री | १० नग देशी दारू बाँबी संत्रा च्या प्रत्येकी १८०ml च्या सिलबंद पावट्या, कि. अं. ६०० /- रू. चा प्रो. माल | ग्राम दाभा ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती | दि.२६.१०.२२ चे १९.१० वा | दि.२६.१०.२२ चे २०.५७ वा | पोहेका शैलेश मोरे ब.नं.१०२९ पोस्टे बडनेरा अमरावती शहर | अविनाश अंबादास कोंटागळे वय- ३६ वर्ष रा. ग्राम दाभा ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती | PSI गजानन बोरवार, ब.न. ९१८ पो.सटे. बडनेरा, अम. शहर. वेळ दि. २६.१०.२२ चे २०.५७ वा. वा ते २१.३० | हकीकत अशाप्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता.वेळी व ठिकाणी गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या माहितीद्वारे नमुद आरोपीवर पंचासमक्ष रेड केला असता त्याच्या ताब्यातुन १० नग देशी दारू बाँबी संत्रा च्या प्रत्येकी १८०ml च्या सिलबंद पावट्या, कि. अं. ६०० /- रू. चा प्रो. माल मिळुन आल्याने जप्त करण्यात आला. सदर आरोपीचे कृत्य कलम ६५(ई) महा. दा. का. प्रमाणे गुन्हा होत असल्याने सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | फ्रेजरपुरा | ६८२/२२ कलम ६५ (इ) मदाका. | अवैद्यरीत्या दारु विक्री रीता दारुची वाहतुक करणे. | १)१८० एम एल चे रॉयल स्टॅग२५ नग २)रॉयल स्टग ९०एम एल चे ३० नग ३)इंपीरीयल ब्ल्यु१८०एमएल चे ३०नग ४)इंपीरीयल ब्लु ९० एम एल चे३०नग ५)ऑफीसर चॉईस १८०एमएल चे ३०नग ६)ऑफीसर चॉईस ९०एमएल चे ३० नग ७)रॉयल चॅलेंजर १८० एमएल चे १५ नग ८)मॅजीक मुव्हमेट १८० एमएल चे१०नग ९)मॅजीक मुव्हमेट ९० एमएल चे२०नग यांची एकुन कि अ.३०,९००/-रुपये तसेच स्विफ्ट डीझायर गाडी क्र.एम एच२७डीए९९५४ कि.अ.६,५०,०००/-रु असा एकुन ६,८०,९००/-चा प्रोव्ही माल. | तक्षशिला महाविद्यालय आदिवासी कॉलनी जवळ अमरावती | २६.१०.२२ चे ११.४५ वा. | २६.१०.२२ चे १६.१६ वा . | पोउपनि विलास पोहळेकर पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | सुधीर सत्यनारायण राठी वय ५२ वर्ष रा.पोलीस स्टेशन समोर धामनगाव रेल्वे जि.अमरावती. | भेट देणारे व दाखल अधि. पोउपनि विलाल पोवळेकर पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर<br><br>वेळ ११.५५वा ते १३.०० वा दरम्यान<br><br>प्राथमीक तपासी अधिकारी पोउपनि विलास पोवळेकर पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी यांची ०८.००वा ते १४.०० वा पावेतो डी.ओ.ड्युटी असताना वायरलेसद्वारे माहीती प्राप्त झाली की.मा.सी.पी.स्कॉड प्राप्त झालेल्या खात्रीशील माहीतीवरुन एक इसम दारुची वाहतुक करताना मिळुन आला वरुन फिर्यादी हे पोस्टे चे स्टाफ सह नमुद ठीकाणी गेले असता मा.सी.पी.स्कॉड अधिकारी वस्टाफ हजर मिळुन आले त्यांनी सांगीतले की स्विफ्ट डीझायर क्र.एम एच२७डीए९९५४ मध्ये एक इसमहा दारुची वाहतुक करताना मिळुन आला त्याला थांबवुन त्याचे नाव गाव विचारले असता त्याने आपलेनाव सुधीर राठी वय ५२ रा.धामनगाव रेल्वे जि.अमरावती असे सांगीतले त्याचे गाडीची पाहणी केली असता १)१८० एम एल चे रॉयल स्टॅग२५ नग २)रॉयल स्टग ९०एम एल चे ३० नग ३)इंपीरीयल ब्ल्यु१८०एमएल चे ३०नग ४)इंपीरीयल ब्लु ९० एम एल चे३०नग ५)ऑफीसर चॉईस १८०एमएल चे ३०नग ६)ऑफीसर चॉईस ९०एमएल चे ३० नग ७)रॉयल चॅलेंजर १८० एमएल चे १५ नग ८)मॅजीक मुव्हमेट १८० एमएल चे१०नग<br>९)मॅजीक मुव्हमेट ९० एमएल चे२०नग यांची एकुन कि अ.३०,९००/-रुपये तसेच दारुची वाहतुक करणेकरीता वापरलेली स्विफ्ट डीझायर गाडी क्र.एम एच२७डीए९९५४ कि.अ.६,५०,०००/-रु असा एकुन ६,८०,९००/-रु चा माल पंचासमक्ष जप्त करण्यात आला.फिर्यादीच्या अशा लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |
| ३ | पो स्टे नांदगाव पेठ | अप नं ३६३/२०२२ कलम ६५ (इ) मदाका | अवैध्यदारु विक्रि | आठ नग १८० एम एल बॉबी संत्रा देशी दारु किं अंदाजे ६४० रु चा माल | कठोरा बु स्मशान भुमी जवळ | दि २६-१०-२२ चे १६-०० वा दरम्यान | दि २६-१०-२२ चे् १६-५४ | सरतर्फे पोहेकॉ काळे बं न ८५७ | गणेश उत्तमराव चव्हाण वय ३४ वर्ष रा कठोरा बु | पोहेकॉ काळे बं न ८५७<br>दि २६-१०-२२ चे | हकिकत अशा प्रकारे आहे कि २६-१०-२२ चे ०९-०० ते २१-०० वा पावेतो फि व सोबत मापोकॉ १६४,पोकॉ १५४९ सह पोस्टे ला प्रो रेड ड्युटी असता पेट्रोलिग ड्युटी करित असताना १६-०० वा दरम्यान गुप्त बातमी दारा कडुन खात्रालायक माहीती मिळलीकी |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | मिळुन आला | | | | | | १६-०० वा दरम्यान | एक ईसम कठोरा बु येथे स्मशान भुमी जवळ विना परवाना अवैध्यरित्या देशी दारु ची विक्रि करित आहे अशा मिळालेल्या खबरे प्रमाने प्रो रेड केली असता दारु विक्रि करनारा ईसम आम्हाला अवैध्य रित्या विनि परवाना देशा दारु चा विक्रि करताना जागीच मिळुन आला त्या पंचा समक्ष ताब्यात घेवुन त्याला त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव गणेश उत्तमराव चव्हाण वय ३४ वर्ष रा कठोरा बु ता जि अमरावती असे सांगीतले त्याचे ताब्यातुन एका कापडी थैली मद्ये आठ नग १८० एम एल बाँबी संत्रा देशी दारु किं अंदाजे ६४० रु चा माल मिळुन आला अशा फि च्या लेखी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल करुन तपासात घेतला. |

## अकस्मात मृत्यू

| अ.क्र. | पो.ठाणे | अकस्मात मृत्यू क्रमांक व कलम | वारस/ बेवारस | हॉस्पीटल /ठिकाण | मयताचे नांव | वय /वर्ष | स्त्री/ पुरुष | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | | ६ | ८ | ०९ | १० |
| १ | फ्रेजरपुरा | 79/22 कलम 174जाफो | वारस | संजय गांधी नगर न.2अमरावती | प्रणय मनोज सलामे वय26 वर्ष रा.संजय गांधी नगर अमरावती | 26 वर्ष | पुरुष | पोहेका संजय धोटे ब.न.९४७ पोस्टे कोतवाली. अमरावती शहर | **हकीकत अशा प्रकारे आहे की आम्ही मपोहेका 1081 पोस्टे फ्रेजरपुरा अमरावती येथे आज दि.26.10.22रोजी 21.00 वा ते सकाळी 08.00 वा पावेतो स्टे शन डायरी ड्युटी असताना पोस्टे कोतवाली अमरावती येथील कर्मचारी संजय घोटे ब.न.947 पोस्टे कोतवाली येथी मर्ग क्र.00/22कलम 174जाफो पोस्टेला आणुन दाखल केली.सदर मर्ग मधील मृतक नामे प्रणय मनोज सलामे वय 26 वर्ष धंदा नौकरी रा.संजय गांधी नगर.न.2पोस्टे फ्रेजरपुरा ह्याना दि.25.10.22रोजीराहते घरी हार्ट अँटक आल्यामुळे दुपारी 01.30 वा दरम्यान इलाजाकरीता झेनीथ दवाखाना येथे भर्ती केले असतानी येथे दि.25.10.22रोजी 19.45 वा उपचारा दरम्यान मरण पावले आहे.अशी मर्ग डायरी पोस्टे ला प्राप्त झाल्याने सदरचा मर्ग दाखल करुन तपासात घेतला.** |
| २ | वलगांव . | ५१/२०२२ कलम १७४ जा.फौ. | वारस | कठोरा ते चांदुर बाजार रोड गौतम चोपडे यांचे शेतात. | विष्णु देविदास रोठोड वय ४५वर्ष रा.पोहरा बंदि.ता.जि.अमरावती. | ४५ | पुरुष | पोउपनि विश्वजीत सरनाईक पोस्टे वलगाव दि.२५/१०/२०२२ चे १५/०० वा. ते १५/४५ वा. दरम्यान दाखल अधिकारी ASI गणेश बाबुळकर ब.न.७६४ पोस्टे वलगाव अमरावती शहर | हकिकत अशा प्रकारे आहे कि,यातील फिर्यादी यांनी जबानी रिपोर्ट दिला कि,नमुद घटना ता.वेळी व ठीकानी कठोराते चांदुर बाजार रोड वरील गौवतम चोपडे यांचे शेतात एक अनोळखी ईसमाने पळसाचे झालाडा ठिबंक सिंचनची काळ्या रंगाची नळीच्या साह्याने गळफास घेतला आहे.वरुन त्याची ओळख पटवण्या करीता जिल्हा सामान्य रुग्नालय येथील शवागारात ठेवण्यात आले.आज दि.२६/१०/२०२२ रोजी मयताची बहीन सौ.सविता बालसिंग जाधव रा.बोडणा ता.जि.अमरावती.ही ने मयताची ओळख पटविल्याने त्याचे डाँ.सा.हस्ते P.M करुन प्रेत अत्यविधिकरीता त्याचे नातेवाईकाचे ताब्यात देवुन फिर्यादीचे जबानी रिपोर्ट सदरचा मर्ग दाखल करुन तपासात घेतला |
| ३ | पोस्टे सिटी कोतवाली | ३४/२०२२ कलम १७४ जाफौ | वारस | इर्विन दवाखा अम.शहर घटना ता. वेळ दि.२५/१०/२०२२ चे ००.२० वा पुर्वी | नितिन आनंदराव कोडंलवार, वय ४२ वर्ष,रा. चित्रा चौक.अमरावतीशहर | ४२ | पुरुष | पोउपनि राजेंद्र उमक,पो.स्टे. सिटी कोतवाली अम.शहर | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील मृतक याला त्याचे नातेवाईकांनी चित्रा चौक येतुन इर्विन दवाखाना येथे दि.२५/१०/२०२२ चे ००.२० वा उपचारा करिता भर्ती केले असता ए.ओ.सा.यांनी तपासुन त्यास मृत घोषीत केले.त्याची बॉडी पोस्ट मार्डम करिता इर्विण मर्च्युरि येथे ठेवण्यात आली आहे सदर असा मरणाचा मेमो वरुन पो.स्टे.ला मर्ग दाखल करुण्यात आला आहे.सदर मर्ग पुढील तपास करणे कामी डि.ओ.सा.यांचे आदेसान्वये पोहेका प्रविण ब.नं.९०६ सोबत पोहेका ११३३ यांच्या ताब्यात देण्यात आली आहे. |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | खो.गेट | मर्ग क्र. ३१/२०२२ कलम १७४ जा.फौ. | वारस | जवाहर गेट अमरावती | सुरेश बाबुलाल कास्देकर वय २० वर्ष रा. ह.मु स्टेट बँक श्याम चौक फुटपाथ अमरावती | २० वर्ष | पुरुष | पो.हे.का. संजय मिल्के ब.न. ८४२ पो.स्टे. खोलापुरी गेट अमरावती शहर<br>दि. २६/१०/२०२२ चे १६-१५ वा ते १७/०० वा. पावेतो<br>दाखल व तपासी | हकीकत अशा प्रकारे आहे की, आम्ही ना.पो.का. राजु नागे ब.न. १६३ आज दि. २६/१०/२०२२ रोजी १४/०० वा ते २१/०० वा पावेतो स्टे.डा. ड्युटी असतांना फिर्यादी नामे मालेशा मालसिंग पवार वय ३० वर्ष रा. तपोवन राजुरा पारधी बेडा मार्डी रोड अमरावती याने पो.स्टे. ला येवुन जबानी रिपोर्ट दिला की, यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे मानस पुत्र मृतक सुदेश साबुलाल कास्देकर वय २० वर्ष रा ह.मु.फुटपाथ श्याम चौक अमरावती हा जवाहर गेट येथे मृत अवस्थेत मिळाल्याने पोलीसांनी इर्विन दवाखाना येथे मच्युरी येथे मृतदेह हा सुदेश साबुलाल कास्देकर याचा असल्याचे सांगीतेल वरुन अशा फिर्यादीचे जबानी रिपुोर्ट वरुन सदरचा मर्ग दाखल करुन तपासात घेतला. |